# अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

**कोल्हापूर :** राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षास प्रारंभ झाला आहे. शिवाजी विद्यापीठात अहिल्यादेवींना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सागर डेळेकर आदी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठात नाट्य कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित नाट्य कार्यशाळेची नुकतीच सांगता झाली. कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. २० पेक्षा अधिक विद्यार्थी कार्यशाळेत सहभागी झाले होते.

कार्यशाळेमध्ये डॉ. राजश्री खटावकर (नाट्यकलाकार) यांनी 'नाटकातील अभिनय' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. विकास कांबळे (नाट्य लेखक) यांनी 'नाट्यलेखन विचार' या विषयी मार्गदर्शन केले. नाट्य अभिनेता युवराज केळूसकर यांनी 'रंगमंच तंत्र' तर दिग्दर्शक डॉ. संजय तोडकर यांनी 'दिग्दर्शनाची कार्यपद्धती' यावर प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.

संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रभारी विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई प्रमुख उपस्थित होते. युवराज केळूसकर यांनी आभार मानले.

# तंत्रज्ञान विभागामधील १७० विद्यार्थ्यांना नोकरी

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामधून २०२३-२४ या वर्षी १७० हून अधिक विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राइव्हमधून विविध राष्ट्रीय, बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये पदांवर निवड झाली आहे. ते विद्यार्थी अधिविभागामधील विविध अभियांत्रिकी शाखांमधून पदवीच्या शेवटच्या वर्षाचे शिक्षण घेत आहेत.

या वर्षी अधिविभागामधून ५० हून अधिक नामवंत कंपन्यांनी विद्यार्थ्यांना साधारणपणे वर्षाला तीन ते पाच लाखांची पॅकेजेस देऊन त्यांची निवड केली आहे. अधिविभागामध्ये अभियांत्रिकी क्षेत्रामधील विविध शाखांचे शिक्षण दिले जाते. त्यामध्ये कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, फूड टेक्नॉलॉजी, केमिकल, सिव्हिल, मेकॅनिकल इंजिनिअरिंग, फूड टेक्नॉलॉजी, एनर्जी टेक्नॉलॉजी, एनव्हायरमेंटल सायन्स अँड टेक्नॉलॉजी या शाखांचा समावेश आहे.

तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर प्राधान्य मिळण्यासाठी आणि अधिविभाग औद्योगिक संशोधन केंद्र बनावे, यासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे मार्गदर्शन मिळत असल्याची माहिती या विभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली यांनी दिली. यावेळी विद्यापीठाचे प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल अधिकारी डॉ. राजन पडवळ उपस्थित होते.

“ विद्यार्थ्यांना पूरक आणि रोजगार संधी उपलब्ध होण्यासाठी विभागाचे प्लेसमेंट सेल प्रयत्नशील आहे. प्रतिवर्षी प्लेसमेंट सेलतर्फे विभागामध्ये तांत्रिक विषयावर व्याख्यान, चर्चासत्र, करिअर परामर्ष, व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम, कार्यशाळांचे आयोजन केले जाते.

**-गणेश पाटील,** प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल अधिकारी